# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### कोरोनाच्या महामारीत खाजगी दवाखाने सुरु न ठेवल्याबाबत

**(१) ३२२७ (०२-०६-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या महामारीत खाजगी दवाखाने सुरु ठेवण्याचे आदेश शासनाने काढले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय आदेशांना न जुमानता खाजगी डॉक्टरांनी दवाखाने बंद ठेवले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दवाखाने बंद ठेवून आणीबाणीच्या प्रसंगी शासनास अडचणीत आणणाऱ्या डॉक्टरांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१४-०१-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कोविड-१९ उद्रेक काळात सर्व खाजगी दवाखाने तसेच कोविड शिवाय इतर आरोग्य सेवाही अबाधित सुरू ठेवण्याबाबत वैद्यकिय शिक्षण विभागाने तसेच आरोग्य सेवा आयुक्तालयाने तसेच लॉकडाऊन काळामध्ये वैद्यकिय

आस्थापना सुरू ठेवण्याबाबत वेळोवेळी शासनाकडून सर्वांना सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लोखंडी सावरगाव (ता.अंबेजोगाई, जि.बीड) येथील मानसिक रूग्णालय व स्त्री रूग्णालय सुरु करणेबाबत

**(२) ३३६६ (२९-०५-२०२०) श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाच्या महासंकटामुळे शासनाने बाजार समित्या, गोदाम, विविध शासकीय जागा अशा ठिकाणी कोरोना रूग्णालय सुरु केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोखंडी सावरगाव (ता.अंबेजोगाई, जि.बीड) येथील मानसिक रूग्णालय व स्त्री रूग्णालयाच्या १०० करोड रूपयाच्या दोन इमारती वापराविना पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मानसिक रूग्णालय व स्त्री रूग्णालयात सर्व पदांची भरती शासनाने केली असून रूग्णालय सुरू झाले नसल्याने भरती केलेले डॉक्टर्स व कर्मचारी यांना इतर ठिकाणी प्रतिनियुक्तीवर पाठविले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोन्ही रुग्णालये सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२१-०१-२०२२)** : (१) अंशत: खरे आहे. कोरोना रुग्णांची संख्या झपाटयाने वाढत असताना शासकीय/निमशासकीय जागांवरती कोविड सेंटर सुरु करण्यात आले होते.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) अंबेजोगाई जि.बीड येथील वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्राच्या १०० खाटांकरीता १२९ पदे मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी ४१ पदे भरण्यात आली असून उर्वरित पदे बाह्यस्थ संस्थांमार्फत

भरण्यात येणार असून पदभरतीची कार्यवाही सुरु आहे. भरलेल्या पदांपैकी ४ डॉक्टर्स व कर्मचारी यांच्या सेवा आवश्यकतेनुसार प्रतिनियुक्तीने इतरत्र देण्यात आल्या आहेत.

१०० खाटांच्या स्त्री रुग्णालयाकरीता ६६ पदे मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी ५३ पदे भरण्यात आलेली असून त्यापैकी २ डॉक्टर्स च्या सेवा आवश्यकतेनुसार प्रतिनियुक्तीने देण्यात आल्या आहेत.

अंबेजोगाई जिल्हा बीड येथील वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र व स्त्री रुग्णालय हे ३१ ऑगस्ट, २०२० पासून दोन्ही रुग्णालये डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर म्हणून कार्यान्वित करण्यात आले होते. तद्नंतर वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्रात दिनांक २६/१०/२०२० पासून ते २७/०३/२०२१ पर्यंत आंतररुग्ण व बाह्यरुग्ण विभाग सुरु करण्यात आला होता. त्यानंतर दिनांक २८/०३/२०२१ ते २०/०६/२०२१ पर्यंत या रुग्णालयाच्या इमारतीत डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर कार्यान्वित करण्यात आले होते व दिनांक २१/०६/२०२१ पासून पुर्ववत बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवा सुरु करण्यात आल्या होत्या.

परंतु अद्यापही स्त्री रुग्णालयात कोरोनाबाधितांवर उपचार करण्यात येत आहेत.

---

## डहाणू (जि.पालघर) उपजिल्हा रुग्णालयात व्हेंटिलेटर वापराविना पडून असल्याबाबत

**(३) ८७२१ (१०-०६-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) उपजिल्हा रुग्णालयात व्हेंटिलेटर वापराविना पडून असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात कोरोनाने गंभीर रुप धारण केले असून एकीकडे कोरोना रुग्णांना व्हेंटिलेटरअभावी जीव गमवावा लागत असताना उपजिल्हा रुग्णालयात पाच व्हेंटिलेटर वापराविना पडून असण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने डहाणू उपजिल्हा रुग्णालयात असलेले पाच व्हेंटिलेटर कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२१-०१-२०२२) :** (१), (२) व (३) उपजिल्हा रुग्णालय, डहाणू जि.पालघर येथे केंद्र शासनाकडून (प्रधानमंत्री) कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या २० व्हेंटीलेटर पैकी १५ व्हेंटीलेटर हे डी.सी.एच.सेंटर वेदांन्ता रुग्णालयास पाठविण्यात आले. उर्वरित ५ व्हेंटीलेटर हे N.I.V. करीता डी.सी.एच.सी डहाणू येथे वापरण्यात येत होते. तथापि, सहाय्यक जिल्हाधिकारी, डहाणू यांच्या आदेशान्वये सदरील ५ व्हेंटीलेटर हे अधिग्रहित डी.सी.एच.वेदांन्ता रुग्णालयात कोरोना संक्रमित रुग्णांसाठी पाठविण्यात आलेले आहेत. सदर व्हेंटीलेटर वापरात असल्याने कोणत्याही प्रकारची चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच उपजिल्हा रुग्णालय डहाणू जि.पालघर येथे शासनाकडून पुरवठा करण्यात आलेल्या ७ व्हेंटीलेटर पैकी १ व्हेंटीलेटर जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, पालघर यांच्या आदेशान्वये दिनांक १३/०४/२०२१ रोजी ढवळे रुग्णालय, पालघर येथे कोरोना संक्रमित रुग्णांच्या उपचाराकरीता उसनवारी तत्वावर देण्यात आलेला आहे. उर्वरित ६ व्हेंटीलेटर हे डी.सी.एच.सी सेंटर, डहाणू येथे कोरोना संक्रमित रुग्णांकरीता आवश्यकतेनुसार वापरण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा करण्याबाबत

**(४) ९०२१ (१०-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई**

**गिरकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहे ऑगस्ट, २०२० मध्ये स्वीकारलेल्या सुधारित किमान वेतन धोरणानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना रुपये ५ हजार १०० ऐवजी रुपये ११ हजार ६२५, रुपये ५ हजार १०० ऐवजी १४ हजाराचे पुढे तर पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांसाठी ५ हजार ६०० ऐवजी रुपये १२ हजार तर पाच हजार लोकसंख्येच्या आतील ग्रामपंचायतीच्या लिपिकांना रुपये १२ हजार ६६५ तर पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांना रुपये ११ हजार ९६० व शिपाई तथा सफाई कामगारांना ११ हजार ६२५ इतके कर्मचारीनिहाय वेतन लागू केले असून त्यामध्ये नवीन धोरणानुसार ६ महिन्यांनी रुपये ४०३ ते ४ हजार २२५ राहणीमान भत्ता मिळणार नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सुधारित किमान वेतन धोरण लागू केले असले तरी ग्रामपंचायत लोकसंख्या व ग्रामपंचायत उत्पन्नाच्या अटीशी त्याचा संबंध जोडून त्यानुसार शासनाचा वेतन अनुदान सहभाग कमी केल्यामुळे ग्रामपंचायतींना कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा भूर्दंड सोसावा लागत असल्याचे तसेच सुधारित किमान वेतनाबाबत यावर्षीच्या (सन २०२१-२२) अर्थसंकल्पात तरतूद केली नसल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुधारित किमान वेतन धोरणानुसार ग्रामपंचायत करवसुलीची अट वेतनासाठी रद्द करण्यात यावी व शासनाने १०० टक्के वेतन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना द्यावे अशी मागणी राज्यातील ६० हजार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी शासनाकडे माहे एप्रिल, २०२१ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नियमित वेतन व राहणीमान भत्ता अदा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१४-०१-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही. राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन त्यांचे बँक खात्यात जमा केले जाते.
(२) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन दर लागू करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना राहणीमान भत्ता संबंधित ग्रामपंचायतने ग्रामपंचायत निधीतून देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना राहणीमान भत्ता नियमितपणे अदा करणेबाबत ग्रामपंचायतीना वेळोवेळी अवगत करणेत आले आहे.
(३) नाही, हे खरे नाही. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ मधील तरतूदीनुसार ग्रामपंचायत कर्मचारी हा पूर्णतः ग्रामपंचायत कर्मचारी असून संबंधित ग्रामपंचायतने तिच्या कर्मचाऱ्यांना ग्रामनिधीतून किमान वेतन देणे बंधनकारक आहे. शासनाकडून ग्रामपंचायतीना केवळ आर्थिक मदत व्हावी या हेतूने शासन निर्णय दिनांक २१/०१/२००० अन्वये, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या किमान वेतनासाठी लागणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के अनुदान शासनाकडून तर उर्वरित ५० टक्के खर्च संबंधित ग्रामपंचायतने देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.मात्र,बहुतांश ग्रामपंचायती या आर्थिक दृष्ट्या सक्षम नसल्याने कर्मचाऱ्यांना किमान वेतन देऊ शकत नव्हत्या. यामुळे दिनांक ०४/०३/२०१४ च्या शासन निर्णयान्वये, राज्यातील ग्रामपंचायतीना लोकसंख्या व उत्पन्नानुसार वाढीव अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर सुधारित किमान वेतनाच्या अनुषंगाने अर्थसंकल्पीय तरतूदीबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) होय, हे खरे आहे.

(५) ग्रामपंचायत कर्मचारी यांना शासनाने निर्धारित केलेले किमान वेतनातील शासन अनुज्ञेय हिस्सा नियमितपणे अदा केला जातो. ग्रामपंचायतच्या ग्रामनिधीतून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना राहणीमान भत्ता नियमित अदा करणेबाबत ग्रामपंचायतीना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चुल्हाड (सिहोरा) (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील व्यवसायिकांचे बँकेच्या कर्जाचे तीन वर्षापर्यंतचे व्याज रद्द करण्याबाबत

**(५) ९१०६ (२२-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी टाळेबंदी व संचारबंदी लागू करण्यात येत असल्यामुळे चुल्हाड (सिहोरा) (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील व्यवसायिकांचे व्यवसाय बंद पडले असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने टाळेबंदी व संचारबंदी काळात व्यवसायिकांना कोणत्याही स्वरुपाची मदत केली नसल्याने व्यवसायिक वाढत्या कर्जाच्या थकित हफ्त्यामुळे चिंतेत असून बँक, पतसंस्थांचे कर्ज, व्याज वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने व्यवसयिकांचे तीन वर्षापर्यंतचे व्याज दर रद्द करण्याची मागणी तसेच केंद्र व राज्य शासनाने व्यवसायिकांना मदत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व अध्यक्ष, व्यापारी संघटना सिहोरा यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने व्यवसायिकांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१०-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र सरकार/रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कडून संचारबंदी व टाळेबंदी काळात व्यावसायिकांना मदत करण्यासाठी निरनिराळया योजना राबविण्यात आल्या; जसे की कर्जाचे पुनर्गठन / रिस्ट्रक्चरींग / नियामक पॅकेज. तसेच आत्मनिर्भर योजनेंतर्गत ११ नवीन उपाययोजनांची बँकांमार्फत अंमलबजावणी करण्यात आली.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या भरतीत झालेली अनियमितता दूर करण्याबाबत

**(६) ९४२० (१०-०६-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या भरतीत अनियमितता झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाने वर्ग ३ पदाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती चुकीच्या पध्दतीने होत असल्याने ती दिनांक १ जानेवारी, २०१९ च्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीनुसार करण्याची मागणी जिल्हा परिषद सदस्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २० मार्च, २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या यादीत १२ वी आणि पदवीधर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत असल्याने १५ ते २० वर्षे काम करणाऱ्या सेवाज्येष्ठता असलेल्या १० वी पास कर्मचाऱ्यांना डावलण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भरती प्रक्रियेची चौकशी करावी अशी मागणी जिल्हा परिषद सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रायगड जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या भरतीत झालेली अनियमितता दूर करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१७-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) अशी बाब नाही, तथापि, या अनुषंगाने मा.श्री.विजय भोईर, सदस्य, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांनी दिनांक २२/०३/२०२१ रोजी जिल्हा परिषद स्तरावर पत्रव्यवहार केलेला आहे.
(३) हे खरे नाही, रायगड जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामपंचायत कर्मचारी भरती बाबत सद्य:स्थितीत कार्यवाही सुरू असल्याने भरती प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कोविड-१९ करीता खरेदी करण्यात आलेल्या आरोग्य साहित्यात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७) १००५७ (१८-०६-२०२१) श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोविड-१९ करीता माहे मार्च, २०२० ते जून, २०२१ या कालावधीत रुपये १०,००० कोटींच्या आरोग्य साहित्याची खरेदी झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खरेदीत जिल्हास्तरावर खरेदी करण्यात आलेल्या वस्तूंच्या दरात जिल्हानिहाय तफावत असून या खरेदीबाबत गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात कोविड-१९ करीता आरोग्य साहित्यात गैरव्यवहार करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२१-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

कोविड-१९ करीता आवश्यक असलेल्या औषधे, साहित्य सामुग्री च उपकरणे यांची जिल्हास्तरावर व राज्यस्तरावरून एकूण रुपये, १३२०.६० कोटी इतक्या किमतीची खरेदी झाल्याचे सहसंचालक आरोग्य सेवा (खरेदी कक्ष) संचालनालय, मुंबई यांचेकडील तपशिलावरुन दिसुन येत आहे.
(२) व (३) आपत्कालीन परिस्थिती /लॉकडाऊन काळात कोविड-१९ करीता रुग्णांना लागणाऱ्या साहित्य सामुग्री व औषधींच्या मागणी संख्येत झालेली वाढ, कच्च्या मालाचा तुटवडा, उत्पादन क्षेत्रात कर्मचाऱ्यांची उणीव, दळणवळण साधनांची अनुपलब्धता, लॉकडाऊन इ. बाबी तसेच एकाच बाबीची प्रत्येक जिल्हयांकडून वेगवेगळ्या संख्येची झालेली खरेदी या कारणांमुळे दरामध्ये फरक असल्याचे जिल्हयांनी आरोग्य सेवा (खरेदी कक्ष) संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर केलेल्या कारणमिमांसेमध्ये नमूद केले आहे.

तसेच सदर साहित्याची खरेदी तातडीची गरज लक्षात घेऊन संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेने दिनांक २४/०३/२०२० च्या परिपत्रकातील तरतुदी व प्रचलित नियमावलीस अनुसरुत खरेदी करण्यात आल्याबाबतचा अहवाल जिल्हयांनी आरोग्य सेवा (खरेदी कक्ष) संचालनालय, मुंबई या कार्यालयास दिलेला आहे. त्यामुळे सदर प्रकरणी कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील सिंचन प्रकल्पाचा अनुशेष भरून काढण्याबाबत

**(८) १००८२ (१७-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक १६६४ ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात सरासरीपेक्षा जास्त प्रमाणात पाऊस पडूनही दरवर्षी अनेक गावांमध्ये माहे मार्च ते जून अखेरपर्यंत पाणीटंचाई भासते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारित राबविण्यात येणारे १४७ प्रकल्प निधीअभावी पूर्णत्वास गेले नसून हजारो कोटी रुपये खर्च करून देखील सिंचनाचा अनुशेष भरून निघालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपूर्ण योजनांची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करुन आवश्यक त्या योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन निधीच्या उपलब्धतेनुसार अपूर्ण असलेल्या प्रकल्पांचे नियोजन पूर्ण करण्यात आले आहे काय तसेच, सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी शासन कालबध्द आराखडा तयार करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (१४-०१-२०२२) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

(२) होय. हे अंशत: खरे आहे.

कोकण प्रादेशिक विभागांतर्गत महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अंतर्गत १४७ योजनांपैकी ठाणे जिल्हयातील ९ पालघर जिल्हयातील २ रायगड जिल्हयातील ३ व सिंधुदूर्ग जिल्हयातील १ अशा एकूण १५ योजना या वनजमिनीच्या प्रक्रियेमुळे अद्‍याप सुरु झालेल्या नाहीत.

भुसंपादन व पुनर्वसनाच्या अडचणीमुळे ठाणे जिल्हयातील १ रायगड जिल्हयातील १ रत्नागिरी जिल्हयातील २८ व सिंधुदूर्ग जिल्हयातील ९ अशी एकूण ३९ कामे अपूर्ण राहिलेली आहेत.

तसेच पालघर जिल्ह्यातील १६ योजनांची निविदा मंजूरीकरीता जलसंधारण महामंडळाकडे सादर करण्यात आली होती. तथापि, सदर कामाच्या निविदा प्रक्रियेस महामंडळाने दिनांक २७/०४/२०२० च्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आलेली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील ११ व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३ अशी एकूण १४ योजना ग्रामस्थांच्या विरोधामुळे अपूर्ण आहेत.

ठाणे जिल्ह्यातील २ पालघर जिल्ह्यातील २ रायगड जिल्ह्यातील ४३ रत्नागिरी जिल्ह्यातील १० व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ६ अशी एकूण ६३ कामे बांधकामाच्या विविध टप्प्यावर प्रगतीपथावर आहेत. सदर योजनांमुळे १२७४६ हे. सिंचन क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. सदर योजनांचा सिंचन अनुशेष भरुन निघण्यास मदत होईल.

उपरोक्त कारणांशिवाय सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधी अनुउपलब्धता या कारणांमुळे प्रकल्प अपूर्ण राहिलेले आहेत. कोकणातील सिंचन अनुशेष भरण्याच्या तसेच पाणी टंचाई कमी करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत ठाणे जिल्ह्यात २३, पालघर जिल्ह्यात ३२, रायगड जिल्ह्यात ५९, रत्नागिरी जिल्ह्यात ९, सिंधुदूर्ग जिल्ह्यात २ अशा एकूण १२५ योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर योजनांन्वये ४०९२ हे. सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे.

(३) सदर अपूर्ण योजनांची भुसंपादन प्रक्रिया पूर्ण करून निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन असून आवश्यक त्या योजनेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घेऊन निधीच्या उपलब्धतेनुसार अपूर्ण असलेले प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

प्रकल्पाचा खर्च वाढल्याने काही प्रकल्प शासनाच्या प्रचलित मापदंडात व्यवहार्य ठरत नाहीत ही बाब लक्षत घेऊन ल.पा. प्रकल्पाचा मापदंड सुधारीत करणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(९) १०२३० (२७-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील उजनी धरणाच्या पाण्यावर प्रकल्पग्रस्तांचा पहिला अधिकार असल्यामुळे उजनी पाणी वाटप समिती वा नियोजनात प्रकल्पग्रस्तांचा एक प्रतिनिधी असावा अशी मागणी शासनाकडे गत ५ वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडे उजनीची पाणी पातळी कमी झाली तरी प्रकल्पग्रस्तांसाठी राखून ठेवलेला पाणीसाठा अखंडितपणे सुरु ठेवण्याबाबत, वीज कपात न करता वीज पुरवठा करण्याबाबत, उजनीचे ओव्हरफ्लो पाणी कोळगाव धरणात सोडण्याबाबत, करमाळा तालुक्यातील गावांना उजनी धरणातून पिण्याचे पाणी देण्यासाठी नवीन पाणीपुरवठा योजनांना मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच, उजनीतून मराठवाड्यास पाणी जाणार असून त्या प्रकल्पाचेही काम युध्दपातळीवर सुरू असून यात करमाळा तालुक्यातील काही गावांचा समावेश करून बोगद्यातून शेतीसाठी पाणीपुरवठा करण्यास मान्यता देण्याबाबत केलेल्या मागण्या अद्याप प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०७-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारत उपलब्ध करुन देण्याबाबत व जुन्या अंगणवाड्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१०) १०२७४ (२७-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागपूर जिल्ह्यातील ६३७ अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारत नसल्याने या अंगणवाड्या शासकीय शाळा, समाज मंदिर, ग्रामपंचायत कार्यालय व भाड्याच्या खोलीत भरवल्या जात असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नागपूर जिल्ह्यातील अंगणवाड्यांना स्वतंत्र इमारत उपलब्ध करुन देण्याबाबत व जुन्या अंगणवाड्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (१४-०१-२०२२) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत २१६१ अंगणवाड्या व २६२ मिनी अंगणवाड्या अशा एकूण २४२३ अंगणवाड्या कार्यरत आहेत. २१६१ अंगणवाड्यांपैकी १७७८ अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत आहे व उर्वरित ३८३ अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत नाही. स्वत:ची इमारत नसलेल्या ३८३ पैकी १०१ अंगणवाड्या नगर पंचायत / नगरपरिषद / नगरपालिका क्षेत्रात आहेत. ११६ अंगणवाडी इमारतीचे बांधकाम मंजूर / चालु आहे. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२०-२१ अंतर्गत ६० नविन अंगणवाडी इमारत बांधकाम प्रस्तावित आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१९-२० मध्ये बांधकामास ८ वर्ष पूर्ण झालेल्या अंगणवाड्यांची दुरुस्तीची १६४ कामे घेण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मृद व जलसंधारण कार्यालय, बुलढाणा अंतर्गत कामाच्या निविदा प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(११) १०५५० (२३-११-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मृद व जलसंधारण कार्यालय, बुलढाणा अंतर्गत १४९ कामे एकत्रित करून एकच निविदा प्रक्रिया काढून १७३ कोटींचा गैरप्रकार करण्यात आला असल्याची बाब दिनांक १ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा येथील तत्कालीन संबंधित मृद जलसंधारण अधिकाऱ्यांनी स्वतःच्या मर्जीतील कंत्राटदाराला निविदा प्रक्रियेचा फायदा व्हावा व स्वतःचा आर्थिक फायदा करून घेण्यासाठी सदर निविदा प्रक्रिया एकत्रित करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर निविदा प्रक्रियेत गैरप्रकार व वित्तीय अनियमितता करणाऱ्या संबंधित मृद व जलसंधारण अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (१६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

मृद व जलसंधारण विभाग, बुलढाणा या कार्यालयाने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद निधी स्तोत्रातील १३२ कामासाठी रुपये १५७५६.७५ लक्ष किंमतीच्या २४ ई निविदा व शासन निधीतील १८ कामासाठी रुपये १४९८.७४ लक्ष किंमतीची एक निविदा अशा एकूण २५ ई निविदा माहे फेब्रुवारी, २०२१ रोजी काढण्यात आल्या आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासनाच्या सेवेत दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी स्थापना करण्यात आलेल्या अभ्यासगटाने अहवाल सादर करण्याबाबत

**(१२) १०६३५ (१८-११-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सेवेत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना/राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्याकरीता दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजी स्थापन करण्यात आलेल्या अभ्यासगटाने २ वर्षाचा कालावधी होवूनही आपला अहवाल शासनास सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अभ्यासगटाने आपला अहवाल शासनास तातडीने सादर करण्यासंदर्भात नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी दिनांक २१/०८/२०२१ रोजी पत्र पाठवून विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, सदरहू अभ्यासगटामार्फत केव्हापर्यंत अहवाल सादर करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (०९-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नागपूर विभागाच्या शिक्षक प्रतिनिधींचे दिनांक २१/०८/२०२१ चे पत्र वित्त विभागाला प्राप्त झाले नाही.

(४) व (५) राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ०१/११/२००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी लागू केलेल्या राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेच्या (NPS)(पूर्वीच्या परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना-DCPS) अंमलबजावणीच्या त्रुटीचा अभ्यास करण्यासाठी दिनांक १९/०१/२०१९ च्या

शासन निर्णयान्वये मा.राज्यमंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अभ्यासगटाकडून त्रुटींचे निराकरण करण्याच्यादृष्टीने अभ्यास करण्यात येत आहे. अलिकडेच अभ्यासगटाने राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेत शासनाचे अंशदान १०% वरुन १४% करण्याबाबतच्या समितीच्या शिफारसीबाबत शासनाने दिनांक १९/०८/२०१९ रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत.

---

## राज्यातील जलयुक्त शिवार योजनेची कामे पूर्णत्वास नेण्याबाबत

**(१३) १०८४५ (२३-११-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महत्वाकांक्षी जलयुक्त शिवार योजनेतील अनियमितता झालेल्या कामांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून (एसीबी) चौकशी होणार असून या चौकशीच्या अनुषंगाने कोकणातील १२८ कामांची निविदा न काढताच देयके अदा करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेत पाणलोट संदर्भातील नियम डावलल्याने पर्यावरणाची हानी होत असल्याचा आरोप या क्षेत्रातील तज्ञांनी व्यक्त केला असल्याने कोकणातील या कालावधीत झालेल्या सदर कामांची चौकशी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यातील ४० गावांतील मंजूर असलेल्या ८९ कामांची तपासणी करून या कामातही अनियमितता झाली असल्याचा ठपका चौकशी समितीने ठेवला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सदर लोकहिताची कामे तात्काळ पूर्णत्वास नेण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (१६-१२-२०२१)** : (१) जलयुक्त शिवार योजनेंतर्गत झालेल्या कामांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी सुरू आहे.

मात्र निविदा न काढताच कामांची देयके अदा करण्यात आली अशी बाब आढळून आली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) रत्नागिरी जिल्ह्यातील ६ गावातील १७७ कामांची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील ५ तक्रारींच्या अनुषंगाने आवश्यक दस्ताऐवज लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना सादर करण्यात आले असून चौकशी सुरू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## राज्य शासकीय कार्यालये आणि जिल्हा परिषदांतील अधिकारी, कर्मचाऱ्यांची २ लाखांहून अधिक पदे रिक्त असल्याबाबत

**(१४) ११२०१ (२०-११-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कार्यालये आणि जिल्हा परिषदांतील अधिकारी, कर्मचाऱ्यांची २ लाखांहून अधिक पदे रिक्त असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त असलेल्या पदांपैकी १ लाख ४१ हजार ३२९ पदे सरळ सेवेने तर ५८ हजार ८६४ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१७-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे. माहे डिसेंबर, २०१९ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार शासकीय आणि जिल्हा परिषद कार्यालयांमधील गट अ, ब, क व ड या संवर्गातील सरळसेवेची व पदोन्नतीची मिळून अंदाजे २,००,१९३ इतकी पदे रिक्त आहेत.

(३) पदोन्नतीची रिक्त पदे भरण्यावर कोणतेही निर्बंध नाहीत. वित्त विभागाच्या दिनांक १६/०५/२०१८ च्या शासन निर्णयान्वये व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये शेतकऱ्यांना सुविधा

पुरविण्यासाठी महत्त्वाच्या सेवेशी निगडित असलेली सरळसेवेची रिक्त पदे भरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच, विविध विभागांच्या पदांच्या आवश्यकतेनुसार सरळसेवेची रिक्त पदे भरण्यास दिनांक ०९/०६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठित उपसमितीमार्फत मान्यता देण्यात येते. वित्त विभागाच्या दिनांक ३०/०७/२०२१ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील १०० टक्के रिक्त पदे भरता यावीत याकरीता वित्त विभागाच्या विविध शासन निर्णयान्वये पदभरतीवर घातलेल्या निर्बंधांमधून सुट देण्यात आली आहे.
त्यानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांकडून करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साकोली (जि.भंडारा) तालुक्यातील तलावांची देखभाल, दुरुस्ती व खोलीकरण करण्याबाबत

**(१५) ११२६२ (२३-११-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात १६०२ तलाव असून यापैकी साकोली उपविभागात ५६५ तलाव असून हजारो एकर शेती सिंचनाची क्षमता असलेल्या तलावांकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याने मालगुजारी तलावामध्ये (मामा तलाव) गाळ साचला असल्याचे तसेच, वरठी (ता.साकोली, जि.भंडारा) तलावाची देखभाल, दुरुस्ती अभावी दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तलावांची देखभाल, दुरुस्ती व खोलीकरणाकडे दुर्लक्ष केल्याने हजारो एकर सिंचन क्षमता असलेले तलाव निकामी झाले असून तलावांचे सौदर्यीकरण, देखभाल, दुरुस्ती, खोलीकरण, वाढते अतिक्रमण व गाळाचा उपसा करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (१६-१२-२०२१)** : (१) हे खरे नाही.

भंडारा जिल्ह्यात जलसंपदा विभागांतर्गत २८ व जिल्हा परिषद अंतर्गत ११५४ असे एकूण ११८२ माजी मालगुजारी तलाव आहेत. यापैकी साकोली उपविभागात एकूण २६५ मामा तलाव आहेत. जलसंपदा विभागांतर्गत भंडारा जिल्ह्यातील २८ पैकी खोलीकरण आवश्यक २३ तलावातील २०३८.७० सघमी गाळ काढून खोलीकरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे पाणीसाठ्यात वाढ होवून सिंचन क्षेत्रात वाढ होण्यास मदत झाली आहे. वरठी हे गाव साकोली तालुक्यात नसून मोहाडी तालुक्यात आहे. या गावात मामा तलाव अस्तित्वात नाही.

(२) हे अंशतः खरे आहे.

भंडारा जिल्ह्यातील एकूण ११८२ मामा तलावांपैकी ४९५ तलावांच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. तसेच साकोली तालुक्यातील मामा तलाव दुरुस्तीबाबतची स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी शासनाकडे प्राप्त आहे.

(३) भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेकडील एकूण ११५४ तलावांपैकी ४८२ तलावांची दुरुस्ती करण्यात आली असून दुरुस्ती आवश्यक असलेल्या उर्वरित ४६ तलावांची दुरुस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. जलसंपदा विभागाकडील प्रशासकीय मान्यता प्राप्त २० तलावांपैकी १३ कामे पूर्ण झाली असून ७ कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच साकोली उपविभागांतर्गत १७ पैकी १४ मामा तलावातील गाळ काढण्यात आलेला आहे. याशिवाय जिल्हा परिषदेकडील ८३ मामा तलावातून गाळ काढण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकऱ्यांना साठवण तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(१६) ११२८५ (१५-११-२०२१) श्री.रामराव पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगांव (जि.नांदेड) तालुक्यातील सोमठाणा, बाभूळगांव व हिप्परगा गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी साठवण तलावासाठी संपादित केल्यानंतर जमिनीचा मोबदला देण्याबाबत शेतकऱ्यांनी शासनाकडे अनेकवेळा निवेदने देवूनही शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनीचा मोबदला मिळाला नसल्यामुळे नायगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लक्ष्मण धोंडीबा गायकवाड या शेतकऱ्यांने साठवण तलावासाठी संपादित जमिनीचा मोबदला मिळण्याकरीता दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड, पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड, जिल्हा संधारण अधिकारी कार्यालय, नांदेड यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (१६-१२-२०२१) :** (१), (२) व (३) होय.

(४) सदर प्रकरणी दिनांक ०१/०२/२०१६ रोजी रुपये ७,७०,९७,१५७/- चा अंतिम निवाडा पारित झाला असून या प्रकरणतील २४ भूधारकांना एकूण मावेजाच्या ३०% रक्कम भूधारकांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. महाराष्ट्र

जलसंधारण महामंडळाकडील भूसंपादनाचे प्रलंबित दायित्व प्राधान्याने अदा करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ११/११/२०२१ अन्वये महामंडळास निधीचे वितरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील अनेक ठिकाणी झालेली गॅस सिलेंडरची भाववाढ कमी करण्याबाबत

**(१७) ११३११ (१७-११-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: यवतमाळ जिल्ह्यासह अनेक ठिकाणी गॅस सिलेंडरची भाववाढ झाल्याने सामान्य नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी केंद्र शासनाकडून गॅस सिलेंडरच्या किंमतीमध्ये करण्यात आलेली दरवाढ कमी करण्याबाबत राज्य शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२१-१२-२०२१) :** (१) होय. काही ठिकाणी निदर्शने केल्याच्या घटना घडल्या आहेत.
(२) घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरवर जीएसटी कायद्यांतर्गत ५% कर आकारण्यात येतो. त्यामध्ये मागील तीन वर्षात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. जागतिक व्यापारपेठेत होणाऱ्या भाववाढीमुळे गॅसच्या मूळ किंमतीत वाढ होत असते. तसेच गॅस सिलेंडरच्या किंमतीत होणारी वाढ हा विषय केंद्रशासनाच्या अखत्यारीत येतो.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या स्मारकाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१८) ११५४९ (२४-११-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या आसोदा या जन्मगावी सन २०१२ मध्ये शासनाने त्यांचे स्मारक उभारण्यासाठी जिल्हा विकास नियोजन योजनेतून रक्कम रुपये ५ कोटी इतका खर्च केला असून स्मारकाचे काम अर्धवट स्थितीत असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ९ ते १० वर्षापासून प्रलंबित असलेल्या स्मारकाचे काम पूर्ण करण्यात न आल्यामुळे स्मारकाच्या तीन एकर जागेत झाडे-झुडपी व गवत वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या स्मारकाचे काम पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत वा ग्रामविकास निधी योजनेंतर्गत पूर्ण करण्यात यावे अशी मागणी तेथील मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.पर्यटन मंत्री, मा.ग्रामविकास मंत्री तसेच मा.पालकमंत्री, जळगाव जिल्हा यांचेकडे माहे जुलै-ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जळगांव जिल्ह्यातील मा.लोकप्रतिनिधीनी शासनाकडे केलेल्या मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (१७-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर कामाकरीताच्या रुपये ४९९.७८ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रुपये ४१६.८० लक्ष निधी खर्च झाला आहे.

(२) इमारतीच्या आवारात झाडे-झुडपे व गवत वाढले असल्याने, स्वच्छता करण्याबाबतचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागास देण्यात आले आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) राष्ट्रपुरुष/थोरव्यक्ती यांचे स्मारके/पुतळे उभारणे ही योजना सद्य:स्थितीत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राबविण्यात येत नाही. तथापि, विषयाधिन प्रकरणी मूळ प्रशासकीय मान्यता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत देण्यात आलेली असल्याने पूर्वोदाहरण म्हणून न धरता एक विशेष बाब म्हणून इतर जिल्हा योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांना कळविण्यात येत आहे

---

## राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत स्वतंत्र औषधी विभाग स्थापन करण्याबाबत

**(१९) १३७७९ (२०-०४-२०१७) ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत स्वतंत्र औषधी विभाग स्थापन करणेबाबत केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने शासनाला माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२१-०१-२०२२) :** (१) प्रस्तुत विषयाबाबतचे केंद्र शासनाचे पत्र प्राप्त झाल्याचे अभिलेखावरुन दिसुन येत
नाही.

(२) शासनाने दिनांक २६/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये हाफकीन जीव औषध महामंडळ, मुंबई अंतर्गत औषधी व तद्अनुषंगीक साहित्य खरेदीकरीता स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे व या खरेदी कक्षामार्फत सद्य:स्थितीत: सर्व औषधी व तद्अनुषंगीक साहित्याची खरेदी केली जात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नव्याने निर्माण करण्यात आलेली विविध रुग्णालयातील पदे भरण्याबाबत

**(२०) ३०७३३ (१७-०४-२०१७) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कुपोषणाची समस्या व बालमृत्यूचे प्रमाण रोखण्याकरीता आदिवासी दुर्गम व ग्रामीण भागात आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी राज्यात नव्याने निर्माण करण्यात आलेली ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, ट्रामा केअर युनिट अशा १११ नवीन संस्थांसाठी १ हजार ३३२ पदे नव्याने निर्माण करण्यात येणार असल्याची माहिती मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत कोणत्या रुग्णालयात किती पदे नव्याने भरण्यात आलेली आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२३-०७-२०२१) :** (१) राज्यातील कुपोषणाची समस्या व बालमृत्यूचे प्रमाण रोखण्याकरीता आदिवासी दुर्गम व ग्रामीण भागात आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी राज्यात नव्याने निर्माण करण्यात आलेली ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, ट्रामा केअर युनिट अशा १११ नवीन संस्थासाठी १,६२६ पदे शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : पदनि-२०१५/ प्र.क्र. २७२/ आरोग्य-३, दिनांक ०२ जानेवारी, २०१७ अन्वये निर्माण करण्यात आली आहे.
(२) आतापर्यंत खालील रुग्णालयात २३४ पदे नव्याने भरण्यात आलेली आहे :-

| अ. क्र. | रुग्णालयाचे /ट्रामा केअर युनिटचे /संस्थेचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण रुग्णालय, मंदाणे, जि.नंदुरबार | २५ | - |
| २ | उपजिल्हा रुग्णालय कळंब, उस्मानाबाद (५० खाटा) | २० | ११ |
| ३ | उपजिल्हा रुग्णालय त्रंबक, नाशिक (५० खाटा) | २२ | १३ |
| ४ | उपजिल्हा रुग्णालय वरोरा, चंद्रपूर (१०० खाटा) | ४९ | ६ |
| ५ | ट्रामा केअर युनिट सावंतवाडी, सिंधुदूर्ग | १५ | ० |
| ६ | ट्रामा केअर युनिट कणकवली, सिंधुदूर्ग | १५ | ० |
| ७ | ट्रामा केअर युनिट राजगुरुनगर चांडोली, पुणे | १५ | ७ |
| ८ | ट्रामा केअर युनिट वरोरा, चंद्रपूर | १५ | ३ |
| ९ | ट्रामा केअर युनिट सटाणा, नाशिक | १५ | ६ |
| १० | ट्रामा केअर युनिट देगलूर, नांदेड | १५ | ११ |
| ११ | १०० खाटांचे स्त्री रुग्णालय, धुळे | ९७ | ३२ |
| १२ | १०० खाटांचे स्त्री रुग्णालय, गडचिरोली | ९७ | ४५ |
| १३ | १०० खाटांचे स्त्री रुग्णालय, चंद्रपूर. | ९७ | - |
| १४ | १०० खाटांचे स्त्री रुग्णालय, चंद्रपूर. | ९७ | - |
| १५ | जिल्हा रुग्णालय धुळे (अतिरिक्त १०० खाटा) | २१० | ७१ |
| १६ | जिल्हा रुग्णालय जळगांव (अतिरिक्त १०० खाटा) | ८२ | १७ |
| १७ | संदर्भसेवा रुग्णालय अमरावती (टप्पा २) | २७८ | १२ |
| एकूण | | १,१३९ | २३४ |

उर्वरित पदे भरण्याबाबतची कार्यवाही आयुक्तालयाच्या स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.